महाराष्ट्र शासन
गृहविभाग
पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे.
पुणे रेल्वे स्टेशन, मेन गेट जवळ, पुणे. पिन कमांक ४११००१
दुरध्वनी कमांक– ०२०–२६१२९३९८
ई मेल—ps.pune.prly@mahapolice.gov.in

पुणे लोहमार्ग पो.ठाणे, जा. क्र. /२०२४

दिनांक ३०/०९/२०२४

# पुणे लोहमार्ग पोलीसांनी ०७ महिण्याच्या बालकाला अपहरणकर्त्यांच्या ताब्यातुन सोडवुन आरोपींस शिताफीने पकडले

पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ६५८/२०२४ बी.एन.एस. कलम १३७४ (२) ३ (५) मध्ये आरोपी नामे १) मोहम्मद खानकुरेशी वय २७ वर्ष राहणार मली घाट देवगड राज्य राजस्थान २) नजमा अक्रम खान कुरेशी वय २५ वर्ष राहणार सदर यांनी संगनमत करुन दिनांक १८/०९/२०२४ रोजी ००:३० वाजल्या नंतर ०५ ते १० मिनिटात पुणे रेल्वे स्टेशन मेन गेटचे बाजुला बसलेल्या यातील फिर्यादी नामे पुजा संतोष दास वय २८ वर्ष धंदा घरकाम राहणार चेनूर दुध कुंडी जिल्हा पश्चिम सिंग भूमी राज्य झारखंड यांचा व त्यांचे मित्रांचा विश्वास संपादन करुन त्यांना अनेक भुल थापा देउन फिर्यादी यांचे रखवालीतून त्यांचे ०८ महिण्याचे पुरुष जातीचे बालक ताब्यातून घेउन गर्दीचा फायदा घेउन परागंदा झाले होते.

सदरचा गुन्हा हा गणेश विसर्जन सुरु असताना झालेला होता त्यामुळे त्याची तिव्रता व गांभीर्य ओळखुन एकुण तीन पोलीस पथके तयार करण्यात आली होती त्यात विशेष व कसबलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा समावेश केला होता. त्याच प्रमाणे तांत्रिक हालचाली टिपण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे यांचे द्वारा समांतर तपास सुरु केला होता.

**परिणामी आरोपींनी गुन्हा करताना परिधान केलेले कपडे, वापरण्यात आलेले तांत्रिक साधने प्राप्त तांत्रिक माहितीचे विश्लेषण, गुप्त बातमीदारांची माहिती तसेच इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी केलेल्या तपासाच्या मदतीनतुन पोलीसांनी आरोपींना उनावा, अहमदाबाद राज्य गुजरात येथे अपहरीत बालकासहीत दिनांक २९/०९/२०२४ रोजी रंगेहाथ पकडुन अपहरीत बालकास १२ दिवसा नंतर सुखरुप सोडवुन गुन्हयाची उकल करुन आरोपी नामे १) मोहम्मद खानकुरेशी वय २७ वर्ष**

Scanned with OKEN Scanner

राहणार मली घाट देवगड राज्य राजस्थान २) नजमा अक्रम खान कुरेशी वय २५ वर्ष राहणार सदर यांना अटक केली आहे.

तरी सर्व जनतेस आवाहान करण्यात येते की, आपल्या लहान बालकांना गर्दीच्या ठीकाणी मोकळे सोडु नये तसेच कोणत्याही भुल थापा अमिष यांना बळी न पडता आपल्या लहान बालकांची योग्य काळजी व दक्षता घ्यावी त्याच प्रमाणे ज्या पालाकांना मुल होत नसेल तर त्यांनी दत्तक बालके घेउन संगोपन करावे त्यामुळे बालकास देखील त्याचे आई वडील मिळतील आणि पालकांनाही बालक मिळुन दत्तक योजना सफल होईल.

सदरची कामगिरी मा पोलीस अधीक्षक सो श्री तुषार दोशी, व अप्पर पोलीस अधीक्षक सो श्री रोहिदास पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री प्रमोद खोपीकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री इरफान शेख, पोलीस निरीक्षक श्रीमती स्मिता वासनिक, यांचे मार्गदर्शना खाली, महिला सहाय्य पोलीस निरक्षक शुभांगी नरके, पोलीस उप निरीक्षक स्वप्नील वाघमोर स्था.गु.शाखा लोहमार्ग पुणे पोलीस उप निरीक्षक श्री सचिन नाझरे, पोहवा १०५१ सुनील कदम, पोहवा ९४५ अनिल टेके, पोहवा ११२२ आनंद कांबळे, पोहवा ५७ निलेश बिडकर, पोहवा १२५१ अनिल दांगट, पोअं २०२ विक्रम मधे, पोअं ११५ नेमाजी केंद्रे, पोअं ६५८ सिध्दार्थ वाघमारे, पोअं २०० विकास केंद्रे, व मपोअं १४६८ जयश्री ढाकरे, तांत्रिक विश्लेषण विभाग पोहवा १०१६ संतोष जगतपा, पोहवा ६९९ रुपेश पवार, पोहवा ७० अमित गवारी, पोअं १११ गवळी स्था.गु.शाखा लाहमार्ग पुणे

(तुषार दोशी) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक
लोहमार्ग पुणे

Scanned with OKEN Scanner


महाराष्ट्र पोलीस
खलनिग्रहणाय